# विहीत नमुना अर्ज

फोटो

१. संपूर्ण नांव :----------------------------------------------------------------------------------

(आडनाव) (नांव) (वडील/ पतीचे नाव)

२. जन्मतारीख :- ----------/---------/---------

३. जात :- (अनुसूचित जाती )

४. जात (उपजात) :-

५. लिंग ( पुरुष/ स्त्री ) :-

६. पत्रव्यवहाराचा पूर्ण पत्ता :- ------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------

७. कायमचा पत्ता :- ------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------

८. दूरध्वनी/मोबाईल क्रमांक :-

९. ई –मेल :-

१०. उच्च माध्यमिक परीक्षा उत्तीर्ण :-

११. गुणपत्रिका (गुणांची टक्केवारी) :-

१२. पदवी परीक्षा उत्तीर्ण गुणपत्रिका :-

१३. नि:समर्थ (अपंग) :- होय/नाही (होय असल्यास तपशील द्यावा)
(Person with Disability)

**ठिकाण:-**

**दिनांक.**

**उमेदवारांची स्वाक्षरी**

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे

२८, क्वीन्स गार्डन, कॅम्प पुणे -४११ ००१.
(सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)

Email : directorbarti@gmail.com Website : http//:barti.maharashtra.gov.in

## अनुसूचित जातीच्या अनुसूचीतील मांग, मातंग, मिनिनमादिग, दखनी-मांग, मांग-म्हशी, मदारी, गारूडी, राधेमांग, मांग-गारोडी, मांग-गारूडी समाजातील युवक- युवतींसाठी बँक, रेल्वे, एल.आय.सी. इ मध्ये लिपिक वर्गीय स्पर्धा परीक्षेच्या पूर्वतयारीसाठी मोफत प्रशिक्षण

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे या संस्थेकडून अनुसूचित जाती मधील मांग, मातंग, मिनिमादिग, दखनी-मांग, मांग-म्हशी, मदारी, गारुडी, राधेमांग, मांग-गारोडी, मांग-गारुडी समाजातील युवक-युवर्तीसाठी बँक,रेल्वे, एल.आय.सी. इ. मध्ये लिपिक व त्या समकक्ष पदाच्या स्पर्धा परिक्षेच्या पूर्वतयारीसाठी चार महिन्याच्या कालावधीचे (निवास व भोजन व्यवस्थेसह) मोफत प्रशिक्षण कार्यक्रम (कोचिंग क्लासेस) खाजगी संस्थेच्या माध्यमातून **पुणे, नाशिक, नागपूर, औरंगाबाद, अकोला व ठाणे** या ठिकाणी राबविण्यात येणार आहे. या प्रत्येक प्रशिक्षण केंद्रावर वर नमूद जातीमधील ५० युवक- युवतींना गुणवत्तेनुसार प्रवेश देण्यात येईल. ३०% जागा मांग व वर नमूद तत्सम जातीतील महिलांकरिता राखीव राहिल. ३% जागा मांग व वर नमूद तत्सम जातीतील दिव्यांग (Person With Disability) व्यक्तींसाठी राखीव राहिल.

वरील जातीच्या इच्छुक व पात्र युवक-युवतींना https://barti.maharashtra.gov.in या वेब साईटवरून 'Notice Board च्या सदराखाली Coachings- Mang-Matang लिंकवरून अर्ज डाऊन लोड करून किंवा खालील नमुद संस्थेच्या कार्यालयातून प्राप्तकरून, खालील पैकी ज्याठिकाणी त्यांना प्रशिक्षण घ्यावयाचे आहे, त्या ठिकाणी असलेली खालील नमूद संस्थांकडे **दि.२१ नोव्हेंबर, २०१७** पर्यंत परिपूर्ण भरलेला अर्ज कागद पत्रांसह सादर करावा.

| अ. क्र. | खाजगी संस्थेचे नांव, पत्ता व मुख्यालय — ठिकाण | अ. क्र. | खाजगी संस्थेचे नांव, पत्ता व मुख्यालय — ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | **स्वप्नपूर्ती सेवाभावी संस्था**<br>व्हिजन ॲकडमी, शॉपनं. ११, ९८५ बहुपती कॉम्प्लेक्स सदाशिव पेठ, ज्ञानप्रबोधन शाळे समोर, पुणे-३०<br>मोबाईल क्रमांक:- ८९७५७८५६६४ **ठिकाण — पुणे.** | २ | **चक्रधर स्वामी सेवाभावी व शैक्षणिक संस्था नाशिक**<br>फतेह हॉस्टेल, शंकरनगर, टाकळी रोड,<br>नाशिक-४२२००१ मोबाईल क्रमांक:- ९६८९९९८४४४<br>**ठिकाण — नाशिक** |
| ३ | **महाराष्ट्र मातंग विकास मंडळ**<br>प्लॉट नं. ४ राजेन्द्र नगर, हिंगणा नाका, हिंगणा रोड, ऑर्चीड हॉटेल चे वर, नागपुर — ४४००३६<br>मो. नं. ९६०७६६३८०२ / ८७८८९६८३०५<br>**ठिकाण — नागपूर.** | ४ | **आस्मिता मागास वर्ग बहुउद्देशीय विकास व संशोधन संस्था, अकोला.**<br>मते कॉम्प्लेक्स, २ आणि ३ मजला, फत्तेपुर वाडी, मोठी उमरी, अकोला-४४४००५ मो. नं. ९६५७४१८६४८ / ९७६५२६१०४८<br>**ठिकाण — अकोला.** |
| ५ | **श्री. जी बहुउद्देशीय संस्था**<br>प्लॉटनं.५, एम. आय. डी. सी. स्टेशनरोड, ता. जि. औरंगाबाद. मोबाईल क्रमांक :- ८८८८७८८७५६, ९९२१६००२९९<br>**ठिकाण — औरंगाबाद.** | ६ | **मानसी महिला औद्योगिक उत्पादक सहकारी संस्था, ठाणे.**<br>४, अशोकवन, बिल्डींग नं. १, ओमकार कॉ.ऑ.हा.सो.निमकर नाका, गणेश मंदिर रोड, टिटवाळा ईस्ट, ता. कल्याण, जि. ठाणे.<br>**ठिकाण — ठाणे.** |

**योजनेच्या अटी व शर्ती :**

१. उमेदवार हा मांग किंवा वर नमूद तत्सम जातीचा असावा.
२. उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा
३. उमेदवाराचे वय १८ ते ३५ पर्यंत असावे.
४. उमेदवार किमान १२ वी पास असावा.
५. निवड केलेल्या उमेदवाराची प्रशिक्षणा दरम्यान निवासाचा व भोजनाच्या खर्चासाठी शासन निर्णयानुसार 'बार्टी' कडून वर नमूद संबंधित संस्थेला निधी देण्यात येईल व उमेदवारासाठी नि: शुल्क निवास व भोजन व्यवस्था संबंधित संस्थामार्फत करण्यात येईल.
६. उमेदवारांना 'बार्टी' मार्फत लिपिक स्पर्धा परिक्षा तयारीसाठी रु.३०००/- किंमतीचे पुस्तकांचा संच देण्यात येईल.
७. विहित नमुन्यामध्ये आवश्यक कागदपत्रांसहीत प्रशिक्षण संस्थेकडे अर्ज दाखल केलेल्या उमेदवारांपैकी पात्र उमेदवाराची संबंधीत संस्थेच्या ठिकाणी संस्थेच्या परिसरात किंवा संस्थेनी सुचविलेल्या इतर परिसरात **दिनांक २६/११/२०१७ रोजी चाळणी परिक्षा** घेऊन त्यामधून उमेदवारांची गुणानुक्रमे ५० प्रशिक्षणार्थ्यांची निवड करण्यात येईल व १० प्रशिक्षणार्थी प्रतिक्षा यादी वर ठेवण्यात येईल. सदर चाळणी परीक्षा बार्टी व संबंधीत संस्थानी मिळून नियोजन करण्यात येईल.'
८. संबंधित प्रशिक्षण संस्थेकडे अर्ज दाखल करण्याची **अंतिम दिनांक २१ नोव्हेंबर, २०१७** असा आहे.
९. सदर प्रशिक्षण दि.०१/१२/२०१७ पासून किंवा त्यासुमारास सुरु करण्यात येईल.

**अर्जा सोबत जोडावयाची कागदपत्रे :-**

१. उमेदवाराचे पासपोर्ट आकाराचे दोन फोटो.
२. जातीच्या प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत.
३. इ. १२ वी उत्तीर्ण गुणपत्रिका प्रत व इतर शैक्षणिक प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती.
४. शाळा सोडल्याचा दाखला किंवा वास्तव्याच्या योग्य पुराव्याची साक्षांकित प्रत जोडावी.

सविस्तर माहितीसाठी पाहा. https://barti.maharashtra.gov.in या वेबसाईटवरुन 'Notice Board च्या सदराखाली Coachings- Mang- Matang लिंकवर.

महासंचालक
बार्टी, पुणे.

Adv.17/10/2017/